स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

माध्यमशास्त्र संकुल

सप्टेंबर २०२१

आंतरविद्याशाखिय पत्रकारिता व जनसंवाद विषयातील पीएच. डी. या पदवीसाठी
सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रबंधाचा आराखडा

‘‘मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता – एक अभ्यास (विशेष संदर्भ: मराठवाडा)’’

संशोधक
देवदत्त कांबळे

मार्गदर्शक
प्रो. डॉ. सुधीर इंगळे
प्रमुख, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.

मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता – एक अभ्यास (विशेष संदर्भः मराठवाडा)

प्रस्तावनाः

मातंग ही जात कोकण सोडले तर महाराष्ट्रभर आढळून येते. या जातीच्या संस्कृतीचा विचार केला तर ही आर्यपुर्व काळातली प्राचिनतम् प्राचिन संस्कृती असून 'मातंग संस्कृती' या नावाने ओळखली जाते[१]. सहाव्या शतकापर्यंत मातंग ही राज्यकर्ती जमात असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कवी बाण या सहाव्या शतकात होऊन गेलेल्या कवीच्या कादंबरीतील वर्णनाचा पुरावा देत म्हटले आहे[२]. तसेच मातंगांच्या आठ राज्यांचा उल्लेख ललीत विस्तारात आहे[३]. या संदर्भाद्वारे संशोधनविषयाच्या समस्येसंबंधाने अधोरेखित होते की, या जातीचे एकेकाळचे वैभव संपुष्टात येवून आज हलाखीचे जीणे ही जात जगत आहे. विस्थापित, शोषित, पीडित, वंचिताचे जीणे जगत आहे. या जातीसारख्या सर्व दलित जाती मुख्य प्रवाहाबरोबर आणण्यासाठी 'आरक्षण' संकल्पना स्वातंत्र्यानंतर अंमलात आणली गेली. आरक्षणाचा जन्मच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक शोषणातून झालेला आहे[४], असं म्हटलेलं आहे. पण आरक्षणांतर्गत आरक्षणाची गरज मातंगांना पडली ती प्रस्थापित शोषण यंत्रणेला समातर अशी अनुसुचित जातीत शोषण यंत्रणा उभी राहिल्याने! मातंगांचा आरक्षणांतर्गत आरक्षणाचा हा लढादेखिल आजपर्यंत यशस्वी झालेला नाही. याबरोबरच मातंगांना लोकसंख्येच्या प्रमाणात सत्तेत वाटा नाही, औद्योगिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात त्यांची संपुर्ण पिछेहाट झालेली आहे. दुसरीकडे मातंगांच्या उत्कर्षाकरिता उभारलेल्या तुटपुंज्या असलेल्या विकास स्त्रोतांना घरघर लागलेली दिसते. जसे की अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ किंवा क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग आणि त्याच्या अंमलबजावणीची झालेली परवड! या सर्व पार्श्वभुमीवर सदर संशोधनाद्वारे मातंग समाजाचे प्रश्न आणि त्यांच्या राजकिय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक इत्यादी समस्या अभ्यासाव्या लागणार आहेत.

पारिभाषिक शब्द 'मातंग' हा संस्कृत भाषेतला शब्द 'मांग' या शब्दाचे संस्कृतीकरण असून त्याचा विग्रह महा+ अंग म्हणजे महा सामर्थ्यशाली असा आहे. कांही विद्वान महा + उत्तुंग असाही उल्लेख करतात. या शब्दाची उत्पत्ती भाषा शास्त्राच्या आधारे, ''शस्त्राशिवाय आतंक माजवणारा'' अशा अर्थाने आहे. म + आतंग : मातंग म्हणजेच मोठा आतंग : पराक्रम असा आशय व शब्दाची उत्पत्ती स्पष्ट होते. मात + अंग : मातंग म्हणजे मात किंवा चढाई अशी उत्पत्ती होते[५]. ''मातंग समाज'' हा शब्द सर्रासपणे वापरला जात असला तरीही मातंग अथवा माग एक जात असून शब्दांचे अर्थ स्वानूभूतीप्रमाणे बदलत असते. अनेक अभ्यासकानी बौध्दिक पातळीवर अध्यात्मिक, अधिभूत, अधिदैव या स्थितीनूरूप मातंगांची जीवनदशा अभ्यासली असली तरी मातंग पत्रकारांनी आणि मातंग जातीच्या विकासासाठीच्या पत्रकारितेला स्थान दणाऱ्या वृत्तपत्रांनी या जातीच्या सद्य स्थितीचे केलेले अवलोकन आणि मातंग स्वानूभूती यातील तफावत निरिक्षणीय व अभ्यासनीय आहे. यामुळेच मातंग पत्रकारितेने मातंगांच्या विकासात आपला वाटा कशाप्रकारे सिध्द केला, हे अभ्यासणे ही संशोधनदृष्टीने महत्वाची वाटते.

मातंग पत्रकारितेबाबत विचार करायचा झाल्यास कांही मुद्दे लक्षात घ्यावे लागतील. ते असे,

१. मातंगांच्या शास्वत विकासासाठी मातंग पत्रकारांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कोणकोणते प्रयत्न योग्य दिशेने, व्यापकतेने हाती घेतले.

२. मातंगांच्या कालानूरूप परिस्थितीचा विचार करू पाहता सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रातील विकास प्रकल्पांना मातंग पत्रकारितेमुळेयोग्य दिशा व गती कितपत मिळाली.

३. असं म्हटलंय की, ''प्रसारमाध्यमांनी जर गुणात्मक दृष्टीने विकास प्रकल्पांना यथायोग्य दिसा व गती दिली तर विकासाचा वेग वाढतो'', या न्यायाने मराठवाड्यातील मातंग जातीच्या पत्रकारांनी मातंग जातीच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी असणाऱ्या विकास प्रकल्पांना यथायोग्य गती देण्याचा आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कितपत प्रयत्न चालवलेला आहे.

४. चितंतन विकास हा नव्या ज्ञानाच्या आकलन व प्रसारावर आधारलेला आहे. माध्यमांनी आपल्या क्षमतांचा उपयोग विकास कल्पनांचा प्रसार करण्यासाठी केला पाहिजे. त्यातून शास्त्रोक्त अशा विकास स्त्रोतांची जपणूक केली पाहिजे. त्यासाठी ज्ञानाचे बहुविध सामाजिक स्तरावर वितरण होण्याची गरज आहे''[६]. या शास्त्रिय विचारांचा धागा पकडून मातंग पत्रकारितेने मातंगाच्या विकासासाठी किती मजल मारली हे संशोधनातून ठळकपणे दिसून येईल.

थोडक्यात, मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता अभ्यासताना मातंग जातीच्या अभ्यासासाठी व विशेषतः मातंनगाचे प्रश्न अभ्यासण्यासाठी या जातीचा इतिहास, संस्कृती, चालीरिती, रूढी परंपरा, स्थित्यंतरे, समस्या, विकास स्त्रोते,व्यवस्था, त्यांच्यावरील अण्यायव अत्याचार इत्यादी बाबी अभ्यासाव्या लागणार आहेत. तसेच मातंग पत्रकारितेच्या समस्यांबरोबरच तिच्या समाजाप्रतीच्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत हे पहावे लागेल. मातंग पत्रकारिता मातंगांच्या 'विकास' म्हणजे 'शास्वत विकासा'साठी प्रयत्नरत आहे का? हे अभ्यासताना आजपर्यंत मातंग पत्रकारितेने काय कर्तव्य बजावले, हे पडताळणे अभ्यासविषयानूरूप ठरेल. एकुणच **''मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता- एक अभ्यास(विशेष संदर्भः मराठवाडा)** हा संशोधनासाठी निवडलेला अभ्यास विषय मराठवाड्यातील मातंग जातीसाठी, या जातीच्या विकासासाठी, या जातीतील दैन्य, दुःख, दारिद्र्य, सल, वेदना, भावना, विचार यासाठी जी पत्रकारिता चालवली जाते, त्या पत्रकारितेची ओळख जगाला होण्यासाठी सर्वार्थाने उपयुक्त ठरेल असा विषय आहे.

मराठवाड्यातील मातंग समाज – थोडक्यात माहितीः

एके काळापासून असपासून अस्पृश्य म्हणुन गणल्या गेलेल्या मांग जातीला ब्रिटिशांनी गुन्हेगार ठरविले होते. करुणेश डोलारे लिहितात, ''इ. स. १८९६ पासून इंग्रजांनी कांही गुन्हेगार घोषित केलेल्या जातींना दररोजची हजेरी लावली होती. रामाशी, मांग, मांग-गारोडी, बेरड या आणि अशाच जातींना हजेरी होती.'' ते पुढे लिहितात, ''स्वातंत्र्यानंतर इ. स. १९५२ साली हा कायदा संपुष्टात आला व हजेरी कायमची बंद झाली.'' १९६१ मध्ये अनुसुचित जातीमध्ये मातंगाना सामाविष्ट करण्यात आले. ''मुंबई इलाख्यातील जाती'' या ग्रंथात श्री. गोविंद मंगेल कालेलकर यांनी मातंगांच्या २४ पोटजाती नमुद केल्या आहेत[७]. या २४ जातीव्यतिरिक्त श्री. म. माटे यांनी २५ वी 'मुसलमान- मांग' ही जात नमुद केली आहे. धर्म, पंथ, भाषा, प्रदेश, विभाग, धंदा, श्रेष्ठत्व, गुन्हेगारी आणि भाटगीरी या कारणांनी या उपजाती निर्माण झाल्या. मराठवाड्यात देखिल या विविध पोटजाती आढळुन येतात. पुर्वी या पोटजातीत आपापसात लग्न कार्ये, रोटीबेटी व्यवहार होत नसत. पण कालौघात हल्ली पुर्वीसारखे राहिलेले सहसा आढळत नाही.

मराठवाड्यातील मातंगांची शेतखळ्याची कामे, पीकाची राखण, जागले, दावे दोरखंड वळणे[८] यासारखी जुनी पारंपारिक तसेच बलुतेदारीची कामे खुप कमी झाली आहेत. मात्र भंगार गोळा करणे, शहरातील महानगरपालिका, नगरपालिकेच्या वा ग्रामिण भागातील ग्रामपंचायतीच्या रस्ते, नाल्यांची सफाई करणे अशा प्रकारची हलकी कामे करणारे कांही लोक आढळून

येतात. झाडु बनवणे, बाजा विणणे, बँड वाजवणे, घरांना रंग देणे, मध गोळा करणे, उसतोडीला जाणे अशा प्रकारचे धंदे या समाजात आढळून येतात. या समाजात ८३ टक्के कुटूंब भूमीहिन आहेत. तर ज्या १७ टक्के कुटुंबाकडे जमीन आहे त्यांचेकडे फार तर १ किंवा २ एकर जमिनीची मालकी आहे. यापैकी बहुतांश जमिन ही कोरडवाहू आणि गायरान जमिन या प्रकारातील आहेत. मराठवाड्यातील मातंगांपैकी फार थोडे सरकारी, निम सरकारी अथवा खाजगी क्षेत्रात नौकऱ्यामध्ये आहेत. बहुतांश मातंग हे अअधुनिक प्रतिष्ठेच्या, मोठ्या मानधनाच्या नौकऱ्यामधुन वगळलेले आहेत[९].

शाहु, फुले, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारधारेला मानणारा या समाजात एक वर्ग निर्माण झालेला आहे. या वर्गात दोन भेद असून त्यातल्या एका छोट्या वर्गाचा बौध्द धर्माकडे म्हणजे धर्मांतराकडे कल दिसतो. तर मोठा वर्ग हा मातंगांच्या धर्मांतराला विरोध करताना आढळून येतो. याचे मुळ बहुधा ‘‘कांही मोजके समाजसेवक सोडल्यास आंबेडकरांचे राजकिय नेतृत्व जसे मातंगांनी मानले नाही तसे धार्मिक नेतृत्वही मानले नाही’’ या प्रा. करूणेश डोलारे यांच्या कयासात दिसून येते. या समाजातील तरूणांनी आताशा शिक्षणाची कास धरलेली दिसते. परंतू म्हणावा तसा हा समाज सुशिक्षित होत नाही. चळवळीच्या नावाखाली भरकटलेला व राजकियदृष्ट्या विखुरलेला हा समाज असून या समाजातला बराचसा तरूण वर्ग ठिकठिकाणच्या प्रस्थापितर नेत्यांच्या मागेपुढे फिरताना दिसतो. राजकिय स्वार्थ आणि अज्ञान यामुळे राजकिय क्षेत्रात प्रभावी नेतृत्व निर्माण झाले नाही.

१९४७ पुर्वी मराठवाडा भाग निजामाच्या राजवटीखाल;ी होता. या काळात मराठवाडा मुक्ति लढ्यात अनेक मातंगांनी सक्रिय सहभाग घेतलेला आहे. या लढ्यातील मातंग जातीतील लढवय्यांची काजळा, जि. उस्मानाबादचे स्वातंत्र्य सैनिक हुतात्मा किशनराव शिंदे, पाथरी, जि. परभणीचे स्वातंत्र्य सैनिक देवराव कांबळे व त्यांचे मधवे बंधु स्वातंत्र्य सैनिक गोपाळराव कांबळेन ही कांही महत्वपुर्ण नांवे सांगता येतील. १९६० च्या दशकात स्वातंत्र्य सेनानी देवराव कांबळे यांनी दोन वृत्तपत्रे काढली. एक ‘रणभेरी’(१९६७) आणि दुसरे ‘रणझुंजार’(१९६८). ही दोन्ही पत्रे परभणीतून निघायचे. या वृत्तपत्रांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानंतर मराठवाड्यात व विशेषतः परभणी जिल्ह्यात व ग्रामिण भागात विकासकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’ या पुस्तकात दिवंगत रा. के. लेले यांनी परभणी येथून प्रकाशित होणाऱ्या ‘रणभेरी’ या साप्ताहिकाचे संपादक एस. एस. राऊत असल्याचे लिहिले आहे[१०]. ही बाब खरी आहे. पण डॉ. देवराव नामदेवराव कांबळे उर्फ अण्णासाहेब कांबळे(पाथरीकर) हे त्याचे संस्थापक व १ले संपादक होते.

-मांगीरबाबाः

औरंगाबाद जिल्ह्यातील शेंद्रा या गावी या देवतेचे स्थान आहे. मांगीरबाबा भक्ताच्या नवसाला पावतो अशी मांग लोक श्रध्दा बाळगतात. या श्रध्देमुळे मागात बहुसंख्य लोक मांगीरबाबाचे भक्त आहेत. औरंगाबाद जिल्ह्यातल्या लाल्या मांगाला हा देव नवसाला पावला होता असे लोक म्हणतात. मांगीरबाबा शुर वीर आणि धाडसी होता. पण तेथिल प्रस्थापित सवर्णांनी त्याला गढीच्या पायात बळी दिले. अशा बळी दिलेल्या मांगाला ‘मांगीर’ – ‘मांग – वीर’ असे म्हणतात. यात्रेत अनेक प्रथा आहेत. मांगीराला बकरा बळी देतात. लोखंडी गळ अंगात टोचून घेतात[११].

मातंग समाजातील थोडे लोक विशेषतः ग्रामिण भागातील लोक अंधश्रध्देवर विश्वास ठेवतात आणि ग्रहणकाळात ‘दे दान सुटे गिऱ्हाण’ म्हणत भिक मागतात. तसेच मातंग समाजातील मुलं गावदेवी, मरिआईला ‘पोतराज’ म्हणून वाहतात. लग्नकार्ये, मंदीराबाहेर आणि अंतयात्रेत हलगी वाजवीणे, मृत जनावर ओढणे, मृत जनावरांची चामडी काढून विकणे या व

अशा प्रथा मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात दिसतात. बऱ्याचदा मातंग या गोष्टी स्वेच्छेने करीत नाहीत तर, तसे करण्यासाठी विशेषतः देवदासी व हलगी वादनाबाबत त्यांच्यावर सवर्ण हिंदूकडून उघडपणे आणि गुप्तपणे दबाव आणला जातो. ही बाब उद्याचा माणूस या साप्ताहिकात लहुजी साळवे अभ्यास आयोगावरील लेखात नमुद आहे. 'वाघ्यामुरळी' आणि 'देवदासी' म्हणून मुलं देवाला सोडण्याची प्रथा कोल्हापुर आणि सांगली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिसते, त्याप्रमाणात मराठवाडा भागात या बाबी आता राहिलेल्या नाहीत. पण ग्रहण मागणे, हलगी वाजवणे यासारख्या बऱ्याच बाबींमध्ये प्रस्थापितांकडून अनेकवेळा दबाव असतो, असं सांगितल्या जातं अनेक ठिकाणी स्मशानभमीचे प्रश्न आहेत. थोडक्यात, मराठवाड्यातील मातंगांवर कोणत्या ना कोणत्या कारणाने सदैव विविध प्रकारचे अन्याय अथ्याचार होत असतात. या अन्याय अत्याचारांची एक प्रचंड मालिका असून या संशोधन विषयात त्यावर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रबंध विधानः

''**मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता- एक अभ्यास(विशेष संदर्भः मराठवाडा)**'' या पीएच. डी. विषयांतर्गत महाराष्ट्रातील 'मातंग' या जात समुहाला केंद्रबिंदु समजुन मातंग समाजाचा सवांगाने अभ्यास केला जाणार आहे. 'प्रबंध विधान' या शब्दाला 'समस्या सुत्र' असा पर्यायी शब्द वापरला जातो. या आंतरविद्याशाखिय संशोधनात मातंग समाजाचे प्रश्न आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी केली जाणारी मातंग पत्रकारिता यांचा सामाजिक संशोधनाचा आधार घेऊन पुढील तीन वर्षे अभ्यास केला जाईल.

अभ्यास विषयाचे महत्वः

सदर संशोधन मातंग समाज आणि मातंग पत्रकारिता यावर केंद्रित असल्याने मातंग लोक आणि मातंग पत्रकार हे या संशोधनाचे लाभार्थि आहेत. या अभ्यासातू सर्वहार मातंगांच्या संस्कृती, इतिहास, रूढी, परंपरा, राजकिय, सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रातली सद्य स्थिती या बाबतची माहिती या लाभार्थ्यांना मिळणार आहे. मातंगांच्या सांप्रत समस्या व प्रश्नांचा शोध घेतला जाईल व त्या समस्यांचे समाधान व प्रश्नांची उत्तरे या अभ्यासांती प्रकट होतील तो लाभ त्यांना होईल, ज्यामुळे मातंगांचा सर्वांगिन विकास होण्यासाठी एक दिशा मिळेल. मातंग पत्रकारिते संदर्भात असणारे संनशोधन मातंग समाजातील पत्रकारांसाठी तत्वशः उपयोगी पडेल. समाजात माध्यम साक्षरता वाढीस लागेल. त्यांच्या जीवनातील पीछेहाट, मागासलेपण, दारिद्य्र, अज्ञान, शोषण, अण्याय, अत्याचार इत्यादीबाबत एक नवी सजगता समाजात निर्माण होईल. शास्वत विकासाच्या मुळ प्रवाहात येण्याबाबत असलेले समाजात असणारे औदासिन्य दुर होईल.

उद्दिष्टेः

१.मातंग पत्रकारितेचा इतिहास संकलित करणे.

२.मातंग पत्रकारितेचे स्वरूप, संकल्पना व महत्व शास्त्रिय पध्दतीने मांडणे.

३.मातंग जातीच्या अभ्यासाद्वारे या जातीची सांप्रत परिस्थिती, प्रश्न व उपाययोजना अभ्यासणे.

४.मातंग पत्रकारितेचा प्रभाव व आव्हाने कोणती आहेत ते अभ्यासणे.

५.मातंग जातीच्या शाश्वत विकासासाठी मातंग पत्रकारितेची भुमिका व त्याचा परिणाम अभ्यासणे.

६.समाज प्रबोधनामध्ये मातंग पत्रकारितेच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

७.मातंग पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपाचा शोध घेणे.

८.मातंगांच्या सामाजिक आंदोलनात मातंग पत्रकारितेची भुमिका अभ्यासणे व विश्लेषण करणे.

९.मातंगांच्या समस्या व त्यांचे निवारण आणि विकासासाठी निवडक मराठी वृत्तपत्रांचा सहभाग अभ्यासणे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र:

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा भाग हे संशोधनाचे कार्यक्षेत्र असल्याने आशय विश्लेषण, सर्वेक्षण, मुलाखती याबाबत मराठवाडा भागाचाच विचार करण्यात आलेला आहे.

मराठवाड्याबद्दल थोडक्यात माहिती:

ऐतिहासिक: मराठवाड्याची ऐतिहासिक माहिती खऱ्या अर्थाने सातवाहन काळापासूनच माहित होते. औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण हे त्याकाळी राजधानी होती. हा काळ मराठवाड्याचा सुवर्णकाळ म्हटल्या जातो. प्राचिन मराठवाड्यात वाकाटक, बदामीचे चालुक्य व उत्तर कल्याणीचे चालुक्य या घराण्यांची सत्ता होती.मध्ययुगीन काळात देवगिरीचे यादव, खिलजी, तुघलक, बहामणी निजामशाही, आदिलशाही, इमामशाही यांची सत्ता होती. देश स्वतंत्र झाल्यावर निजामशाही हैद्राबाद संस्थानाचे अखंड भारतात १९४७ साली विलीनीकरण झाल्याने संपुष्टात आली.

भौगोलिक: मराठवाड्याचा ७०४३९ चौ. कि.मी. क्षेत्रावर विस्तार आहे. मराठवाड्याच्या उत्तरेला महारास्त्र राज्याचे बुलढाणा आणि जळगाव हे दोन जिल्हे, पश्चिमेला नाशिक व अहमदनगर, दक्षिणेकडे सोलापुर आणि कर्नाटकातील गुलबर्गा व बीदर हे जिल्हे, पुर्वेला आंध्र प्रदेश राज्याचे कामारेड्डी, निजामाबाद व आदिलाबाद हे जिल्हे आणि यवतमाळ व अकोला हे जिल्हे अशा प्रकारची भौगोलिक स्थिती आहे. या प्रदेशातील गोदावरी, पुर्णा आणि मांजरा या प्रमुख नद्या आहेत.

औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड हे मराठवाड्यातील जिल्हे असून विभागाचे मुख्यालय औरंगाबाद हे आहे[१२].

२०११ च्या जनगणनेनूसार एकुण लोकसंख्या १८७२८ हजार असून एकुण लोकसंख्येच्या ७२.८८ टक्के लोक खेडयात राहतात[१३]. औरंगाबाद, लातूर, नांदेड वगळता कोणत्याच शहराचा अजून म्हणावा तसा विकास झालेला नसून राजकिय इच्छाशक्तिचा अभाव हेच त्यापाठीमागचे कारण आहे.

संशोधनाचा कालखंड:

सदरील संशोधनाच्या कालखंडामध्ये विद्यापीठाने निश्चित केलेला तीन वर्षाचा कालावधी समोर ठेऊन हे संशोधन पुर्ण केले जाईल.

गृहितके:

१.मातंग पत्रकार अनेक समस्यांना सामोरे जात पत्रकारिता करतात.

२.मातंग पत्रकारिता समाज प्रबोधनाला महत्व देते.

३.मातंग पत्रकारितेला भांडवली वृत्तपत्रे न्याय देण्यास असमर्थ आहेत.

४.मातंगांची जीवनातील सर्व क्षेत्रातील परिस्थिती विदारक असून या वंचित समुदायाचे सर्व क्षेत्रातील विकासाचे प्रश्न कायम आहेत.

५.मातंगांना शाश्वत विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्याची भूमिका सिध्द करण्यासाठी मातंग पत्रकारितेची जबाबदारी मोलाची आहे.

६.मातंग पत्रकारिता प्रभावीपणे राबविण्यासाठी मराठी वृत्तपत्रांना पुर्ण वाव आहे.

७. मातंग जातीमध्ये व पर्यायाने मातंग पकारितेमध्ये विषमतेमुळे विकासाविषयी उदासिनता असल्याचे आढळून येते.

८.मातंगांवर होणारे अन्याय, अत्याचाराविरोधात मातंग पत्रकारिता न्यायासाठी शोषितांची ठामपणे बाजू घेते.

९.मातंग पत्रकारितेने मातंगांची सामाजिक शैक्षणिक तसेच राजकिय आंदोलने सर्व सामान्यांपर्यंत पोहचवली आहेत.

संशोधनपुर्व संदर्भ साहित्याचा आढावाः

डॉ. मच्छिंद्र सकटे, २०१०:

'A Social Study of Matang Community in Maharashtra' या डॉ. मच्छिंद्र सकटे यांच्या संशोधनात असे दिसून येते की, महाराष्ट्रातील मातंग समाजातील चाली, रिती, रूढी, परंपरा, मातंग संस्कृती, मातंगांची उत्पत्ती मातंगाचा प्राचिन इतिहास इत्यादीबाबत अभ्यास करण्यात आलेला आहे. मातंग हे महाराष्ट्रातले खर मूलनिवासी आहेत. जून्या रूढी परंपरांचा त्याग करून मातंगातील एक वर्ग फुले आंबेडकरी विचारधारेने प्रभावित झालेला असून त्याची बौध्द धर्माकडे वाटचाल असल्याचे मांडले आहे. मोजके मातंग ख्रिश्चन व शिख धर्मांतरीत आहेत. पण तो अपवाद आहे. मात्र बहुतांश मातंग हिंदु धर्मातच आहे. असा निर्वाळा या संशोधनातून मिळतो. संशोधनात मांडलेल्या मातंगांच्या राजकिय व सामाजिक चळवळीचा वेध घेता असे दिसून येते की, आरंभीच्या डॉ. देवराव कांबळे व ॲड. लक्ष्मणराव भिंगारदेवे या दोन नेत्यांनी समाजासाठी प्रभावी व भरीव कार्य केलेले आहे. मात्र अवघा मातंग समाज या नेत्यांच्या पाठीमागे कधी खंबीरपणे एकवटला नाही. आंबेडकरी साहित्य, संशोधकी साहित्य, विद्रोही साहित्य असे साहित्य प्रकार आढळून येतात. पण मातंग यात कुठे आढळत नाही. यावर समतावादी साहित्य संमेलनाचा पर्याय या संशोधनात मांडलेला आहे.

डॉ. सोमनाथ कदम, २०१४:

'स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील मातंग समाजाचा सामाजिक व शैक्षणिक इतिहास' हे डॉ. सोमनाथ कदम यांचे संशोधन मौलिक असून त्यांनी 'मातंग समाजाचा इतिहास' या ग्रंथाची निर्मिती केली आहे.प्राचिन काळात टोळीयुध्दामुळे मातंग अस्पृश्यतेखाली ढकलला गेला. मध्ययुगीन काळात मातंग बलुतेदारी पध्दतीत आला. तर ब्रिटिश काळात ब्रिटिशांनी या जातीला गुन्हेगार ठरविले. यामुळे त्यांचा विकास खुंटला. दरम्यानच्या काळात फुले, शाहु, आंबेडकरी विचारांचा पगडा मातंगांवर पडला व आजही या विचारधारेला हा समाज मानत असल्याचे या ग्रंथातून दिसून येते. सामाजिक स्थितीच्या अभ्यासात मातंगांचे राहणीमान, आर्थिक स्थिती सुमार ते हलाखीची असल्याचे या ग्रंथातून दिसून येते.शैक्षणिक जागृती विशेषतः स्त्रि शिक्षणासाठी जागृती होणे गरजेचे असल्याचे या संशोधनातून दिसून येते.

डॉ. अशोक कांबळे(२०१३):

वाजंत्री समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचे विस्तृत विश्लेषण त्याच्या शोध प्रबंधातून दिसून येत. वाजंत्र्यांचे ट्रंपेट, सेक्सोफोन ही वाद्ये वाजवण्यासाठी छातीतून हवा या वाद्यात भरावी लागते. उन्हातली लग्नसराई, त्यात अंगावरचे भरजरी कपडे, फटाक्यांच्या आतषबाजीतून निघणारा धूर यामुळे कॅंसर, दमा, टी. बी. यासारखे फुफ्फुसाचे आजार वाजंत्र्याला विळखा घालतात. लग्न, कार्ये आदींचा आनंद शतगुणीत करणारे बॅंड वाजवणारे कलाकार या सोहळयातले प्रमुख आकर्षण असले तरी कुटुंबाचा आर्थिक गाडा ओढणाऱ्या वाजंत्र्याची या आजारामुळे होणारी दुर्दशा मांडणारा निष्कर्ष मन हेलावून टाकतो.

डॉ. रामचंद्र भिसे(२००९):

'ग्रामिण मातंग स्त्रियांचा दजा व भूमिका, परभणी जिल्ह्यातील मातंग स्त्रियांचा समाजशास्त्रिय अभ्यास' या शोधप्रबंधाद्धारे ग्रामिण मातंग स्त्रियांचे जीवन, राहणीमान इत्यादी संबंधी सामाजिक पातळीवर विस्तृत विश्लेषण मांडण्यात आलेले आहे. ग्रामिण भागातल्या मातंग स्त्रिया रूढी, परंपरा, चालीरिती यावर भाबडेपणाने विश्वास ठेवतात. धर्मावर त्याचा अधिक विश्वास असतो. धार्मिक, सामाजिक प्रथांना विरोध करणे म्हणजे त्यांच्यात पाप समजले जाते. यामुळेच धर्म आणि प्रथा त्यांच्या जीवणाच्या दिशा ठरतात असा निष्कर्ष माडण्यात आलेला आहे.

डॉ. आर गायकवाड शरद(२००७):

'मराठी साहित्यातील मातंग समाज' या शोधप्रबंधातून मातंगांचा प्राचिन इतिहास, गौरवशाली परंपरा, मातंगांचे मुळ पुरूष, समाजव्यवस्थेतले स्थान, त्यांची अंबुजी भाषा या साऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. संत, पंत, तंतांच्या साहित्यातून मातंग समाजाचे संदर्भ सापडतात. महात्मा बसवेश्वराच्या 'अनुभव मंडप' मध्ये मांगचन्नय्या, ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायामध्ये, नामदेवांचे अभंग आणि तुकारामाच्या गाथेमध्ये, रामदासाच्या श्लोकांमध्ये मातंग समाजाविषयीचे पुर्वग्रहदुषित संदर्भ, तिरस्कृत स्वरूपात सापडतात. रामायण, ऋग्वेद, सहदेव भाडळी या हिंदू धर्मग्रंथासह, बौध्द, जैन, महानूभबीय आणि बसवेश्वरांच्या साहित्यातही मातंग समाजाचे प्रसंगानूरूप परंतू हिणकस अर्थाने संदर्भ आलेले आहेत.

पंडिती साहित्यामध्ये पंडित कवी मोरोपंत आणि शाहिरी वाङ्मयातही शाहिर राम जोशी, परशराम, शाहिर पठ्ठेबापुराव यांच्या काव्यातून, लावणीगीतांमधून मातंग समाजाविषयीचे तुच्छतादर्शक आणि अवमानकारक, वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारे उल्लेख आढळतात. हा निष्कर्ष नक्कीच साहित्य क्षेत्रातल्या या भागाचे दोष सिध्द करणारा वाटतो.

तथ्ये संकलन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्ये संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१.प्राथमिक तथ्ये संकलन:

मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारितेचा अभ्यास करण्यासाठी निवडक मराठी वृत्तपत्रांचा अभ्यास करण्यात येईल. या वृत्तपत्रांमध्ये मातंग पत्रकारिता करणाऱ्या कांही पत्रकारांच्या मुलाखती घेण्यात येतील. प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण करण्यात येईल. निरिक्षण पध्दतीचा वापर करण्यात येईल.

२.दुय्यम तथ्ये संकलन:

सदर संशोधन विषयाचे अध्ययन करण्या करिता दुय्यम साधन सामुग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, वृत्तपत्रे व संकेत स्थळांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच नमुना निवड पध्दतीचा वापर करून हे सामाजिक संशोधन पुर्ण केले जाईल. यामध्ये T टेस्ट व F टेस्ट याचा वापर केला जाईल.

आशय विश्लेषण पध्दती:

आशय विश्लेषण हे संशोधनासाठी एक महत्वपुर्ण तंत्र असल्याकारणाने सदर संशोधनासाठी मुलाखत, प्रश्नावली व इतर लिखित किंवा मौखिक भाषाविषयक अभिव्यक्तिद्वारे प्राप्त होणाऱ्या संशोधन तथ्यांच्या आशयाचे क्रमबध्द, वस्तुनिष्ठ आणि परिणामात्मक वर्णन करण्यासाठी हे आशय विश्लेषण तंत्र वापरले जाणार आहे. यासाठी संशोधनाच्या दृष्टीने महत्वाच्या वाटणाऱ्या कांही पत्रकारांच्या आणि कांही महत्वपुर्ण व्यक्तिंच्या मुलाखती घेतल्या जातील. सर्वेक्षण तंत्रासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात येईल. सारणी व आलेख बनवल्या जातील.

संशोधन आराखडा:

संशोधनाच्या विषयानुसार संशोधन आराखडा निश्चित करणे ही महत्वाची पायरी असते. त्यामुळे संशोधन आराखड्याला अनन्यसाधारण महत्व अहे. मराठवाड्यातला मातंग हा एक मोठा समुदाय आहे. यामुळे संशोधन शास्त्राच्या नियमाप्रमाणे एखाद्या मोठ्या समुहाच्या वैशिष्ट्यांचा, स्थितीचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करावा लागतो. मुलाखती, प्रश्नावली, प्रत्यक्ष निरिक्षण, सहभागी निरिक्षण, सामुदायिक दस्तावेज, अभिलेख इत्यादींचे विश्लेषण व बाबींचा सामावेश आराखड्यात होतो. **''मातंग समाजाचे प्रश्न आणि मातंग पत्रकारिता- एक अभ्यास(विशेष संदर्भ: मराठवाडा)''** या विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येणार आहे. वर्णणात्मक संशोधन आराखड्यामध्ये विषयाशी संबंधित वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन केले जाणार आहे. तसेच पुर्ण माहिती प्राप्त करून घेण्यासाठी वैज्ञानिक तंत्राचा वापर केला जाईल.

प्रकरण योजनाः सदर संशोधनाच्या सोयीसाठी एकुण आठ प्रकरणात अभ्यासविषयाची विभागण केली आहे.

प्रकरण १लेः पत्रकारितेचा इतिहास

या प्रकरणात पत्रकारितेचा इतिहास समजून घेताना मराठी पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासावे लागणार आहे. मराठी पत्रकारितेचा उदय, स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील पत्रकारिता, सद्यस्थिती आणि आव्हाने यांचा अभ्यास पाहता दलित पत्रकारिता, सत्यशोधकी पत्रकारिता, आंबेडकरी पत्रकारिता समजून घ्यावी लागणार आहे. यासोबतच मातंग जातीच्या पत्रकारांनी मातंग जातीसाठी चालवलेल्या पत्रकारितेचेही प्राथमिक ओळख होईल. मराठी पत्रकारिता आणि तिचे विकसित स्वरूप अभ्यासून दलितांसाठी विशेषतः मातंगांच्या समस्या, प्रश्ने यासाठी मराठी पत्रकारितेची भमिका तपासावी लागेल.

प्रकरण २रेः संशोधन पध्दती

या प्रकरणात संशोधन विषयाला अनुरूप संशोधन पध्दती अभ्यासावी लागेल. संशोधनाचा अर्थ, व्याख्या अभ्यासावी लागेल. संशोधन पध्दतीचे महत्व लक्षात घेऊन तथ्य संकलन, त्याची तंत्रे, आराखडा, त्याचे प्रकार यांचा अभ्यास करताना सदर संशोधनासाठी वर्णनात्मक आराखड्याचा वापर करण्यात येणार असल्याने वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अभ्यास मांडावा लागणार आहे. तसेच गृहितकृत्यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

प्रकरण ३रेः मातंग समाज

सदर संशोधन विषय हाताळायचा असेल तर मातंग समाजाचे मूळ, इतिहास, संस्कृती, परंपरा, जीवन पध्दती इत्यादी विषयी लेखन केले जाईल. मातंग समाजाचे स्वरूप अवलोकन न करता मातंग पत्रकारितेच्या अभ्यासाला संशोधनदृष्टीने महत्व असणार नाही. त्यांची जीवन पध्दती, समस्या आणि आजची सर्वच क्षेत्रातील त्यांची स्थिती नेमकी कशी आहे हे अभ्यासविषयाच्या दृष्टीने तपासणे महत्वाचे आहे. शाश्वत विकासाचा मुख्य प्रवाह आणि मातंग समाजाचे प्रश्न समजून घ्यावे लागतील. मातंगांचा इतिहास, त्यांची संस्कृती, चाली रिती, रूढी परंपरा, व्यवसाय, उद्योग धंदे, मातंग समाजाची स्थिती यात त्यांच्या विकासासाठीचे स्त्रोत जसे आर्थिक विकास मंडळ, अबकड वर्गीकरण, लहुजी साळवे आयोग इत्यादी, त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार या साऱ्या बाबींचा अभ्यास होईल.

प्रकरण ४थेः मातंग पत्रकारिता

या प्रकरणात मातंग पत्रकारितेच्या संकल्पना आणि स्वरूपाचा अभ्यास पहावा लागणार आहे. मातंगांच्या विकासातील अडथळे, समस्या पाहताना मातंग पत्रकारितेच्या जबाबदाऱ्यांचा अभ्यास करावा लागणार आहे. मातंग पत्रकारितेमुळे मातंग समुदायावर काय परिणाम झाले याचा अभ्यास समजून घ्यावा लागेल. मातंग समाजाच्या सद्य स्थितीबरोबरच या पत्रकारितेसमोरील आव्हानांचा अभ्यास करावा लागणार आहे. सदर संशोधन विषय हाताळायचा असेल तर मातंगांच्या विकासासाठी, त्यांचे विचार, भावना, दुःख, सल, वेदना, उत्कर्ष, प्रगती, समस्या यासाठी तसेच त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी जी पत्रकारिता मातंग पत्रकारांनी चालवली आहे ती पत्रकारिता समजून घेणे अभ्यासविषयाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्यांच्या अभिव्यक्तिच्या वाटा मोकळया होण्यासाठी कोणती पत्रकारिता अपेक्षित आहे? ही पत्रकारिता करणारे करणारे पत्रकार त्यांचे योगदान, त्यांच्या समाजाप्रती जबाबदाऱ्या, त्यांच्या समस्या व आव्हाने यांचा अभ्यास करावा लागेल. यामुळे मातंग समाजाचे प्रश्न व मातंग पत्रकारिता समजून घेता येईल. मातंगांच्या शाश्वत विकासासाठी मातंग पत्रकारितेची भुमिका व आव्हानांचा अभ्यास करावा लागेल. सदर प्रकरण आपला संशोधन विषय अभ्यासण्यासाठी महत्वाचे आहे. मराठी वृत्तपत्रांपैकी कांही निवडक वृत्तपत्रांचा मातंग पत्रकारितेमधला सहभाग अभ्यासावा लागणार आहे.

प्रकरण ५वे: आशय विश्लेषण

संशोधनाचे आशय विश्लेषण हे अभिन्न अंग असल्याने अभ्यासविषयाच्या दृष्टीने आशय विश्लेषणाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, महत्व आणि पध्दतींचा अभ्यास करावा लागणार आहे. आशय विश्लेषणाचा तक्ता अभ्यासावा लागेल. विश्लेषणात्मक आशय विश्लेषण काय आहे, हे पहावे लागेल.

प्रकरण ६वे: सर्वेक्षण

संशोधनात सर्वेक्षणाला फार महत्व आहे. यामुळेच सर्वेक्षण तंत्राचा अभ्यास करून या तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.वर्णनात्मक आणि आलेखात्मक विश्लेषण पहावे लागणार आहे. प्रश्नावलीचा वापर केल्याने मातंग पत्रकारांच्या सुचनाही संशोधन विषयाच्या दृष्टीने अभ्यासाव्या लागतील.

प्रकरण ७वे: निष्कर्ष

सदर प्रकरण म्हणजे संशोधनाचा सार होय. यात ठळकपणे संशोधनात आलेला अनुभव मांडावा लागतो. म्हणजे मातंग समाज, मातंग संस्कृती, मातंगाचा इतिहास, सद्य स्थिती, मातंग समाजाची पत्रकारिता, जबाबदारी, कार्ये या साऱ्या बाबीवर प्रकाश पडणार आहे. या समाजाच्या विकासाच्या मुद्द्यांना पत्रकारितेच्या माध्यमातून मातंग पत्रकारांनी कितपत महत्व दिले, याबरोबरच मातंग पत्रकारितेचे स्वरूप, भूमिका व आव्हानांचे आकलन व मातंग पत्रकारितेचे गुण, दोष काय आहेत, हे समजेल. थोडक्यात, संशोधनात मातंग समाजाचे प्रश्न व मातंग पत्रकारितेच्या संबंधाने साध्य झालेल्या अनुभावांचा लेखाजोखा सदर प्रकरणातून समजून येईल.

प्रकरणाच्या प्रारंभी तालिका, सूची, आलेख आदी सामाविष्ट केली जातील.

परिशिष्ट

संशोधन विषयाच्या पुर्ततेसाठी परिशिष्ट्ये अपरिहार्य आहेत. परिशिष्टांचे खालील प्रकार संशोधनासाठी महत्वाचे आहेत.

१.मुलाखती

सदर संशोधनविषय संबंधाने काही मातंग पत्रकारांच्या व मातंग समाजासंबंधीत महत्वपुर्ण वाटणाऱ्या निवडक व्यक्तिंच्या मुलाखती घेण्यात येतील. ज्यामुळे संशोधन विषयाचे महत्व स्पष्ट होईल.

२.सर्वेक्षण प्रश्नावली

संशोधन विषयासंदर्भातल्या व्यक्तिकडुन माहिती मिळविण्यासाठी बंदिस्त किंवा मिश्रीत प्रश्नावली म्हणजे बंदिस्त व मुक्त दोन्ही मिळुन तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली या दोन्हीपैकी एका प्रश्नावलीचा वापर गरजेप्रमाणे करण्यात येणार आहे. ही प्रश्नावली उत्तरदात्यांकडे पोस्ट किंवा पीडीएफ फाईल तयार करून इंटरनेट साधन जसे इ मेल, इत्यादी साधनांचा वापर करून पाठविण्यात येईल. व त्या प्रश्नावलीतील प्रश्नांची भरलेली उत्तरे संशोधनाच्या आशय विश्लेषणासाठी उपयोगात आणली. जातील.

महत्वाची कात्रणे

संशोधन विषयासंबंधाने विविध वृत्तत्रातून मुद्रित मजकुर, चित्रे इत्यादी उपलब्ध करून त्यांची कात्रणे वापरावी लागणार आहेत.

छायाचित्रे

संशोधन विषया संबंधित महत्वाच्या व्यक्ति, प्रसंग, मोर्चे, सांस्कृतिक उपक्रम इत्यादि संदर्भातली छायाचित्रे मिळवावी लागतील.

ऐतिहासिक पुराबे

संशोधनाच्या यथार्थतेसाठी आवश्यक वाटणारे कांही ऐतिहासिक पुरावे जसे की दस्तऐवज, मातंग पत्रकारिता प्रवाहातली जुनी व दुर्मिळ वृत्तपत्रे इत्यादि बाबींचा उपयोग करावा लागणार आहे.

संदर्भः-

१. डॉ. मारोती कसाब, मातंगः इतिहास आणि संस्कृती, बीज प्रकाशन गृह, शेगाव, जि. बुलढाणा, पा. क्र. १९.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अस्पृश्य मुळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले, संपुर्ण मराठी भाषांतर, राजेश प्रकाशन, पुणे, पा. क्र. १४७.
३.प्र. बी. सी. सोमवंशी, आनंद प्रकाशन औरंगाबाद, भारतीय जाती संस्थेत मातंगाचे स्थान आणि महार- मांग सं बं ध, पा. क्र. २९.
४. दिगंबर घंटेवाड, मातंगाचे आरक्षण आंदोलन, प्रबोधन प्रकाशन, सिडको, नांदेड, पा. क्र. २५.
५. डॉ. सोमनाथ डी. कदम, मातंग समाजाचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातूर, पा. क्र. २२.
६.डॉ. व्ही. एल. धारूरकर, जनसंवाद सिध्दांत, चैतन्य प्रकाशन, पा. क्र. ३३२.
७. करूणेश डोलारे, महाराष्ट्रातील मातंग समाज, मार्ग प्रतिष्ठाण प्रकाशन, पुणे, पा. क्र. २५.
८.डॉ. श्रीकृष्ण पाथरीकर, आपले अण्णा(चरित्राभ्यास), सुरेंद्र पब्लिकेशन, औरंगाबाद, पा. क्र. ४२.
९.मा. उद्याचा माणुस, जुलै, ऑगस्ट २०१०, पा. ४३,४४.
१०. रा. के. लेले, मराठी वृत्तपत्राचा इतिहास, पा. क्र. १०८३.
११.मच्छिंद्र सकटेः २०१०, पा. सं. १२६.
१२. http://mr.m.wikipedia.org
१३. अजितकुमार (संकलन, संपादन), जनगणना विश्लेषण(भारत- महाराष्ट्र- जग), बी पब्लिकेशन, पुणे, पा. क्र. १०.

संशोधक,

देवदत्त मारूतराव कांबळे

मार्गदर्शक,

प्रो. डॉ. सुधीर इंगळे
प्रमुख, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.